**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत शेख महंमद महाराज : धार्मिक सद्भावनेचे प्रतिक

**प्रा. संदीप परदेशी**

सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

**प्रास्तविक :**

संत ज्ञानेश्वरांचा विश्वात्मक दृष्टीकोन आणि संत कबीरांच्या एकेश्वरवादाचा पुरस्कार करणाऱ्या संत शेख महंमद महाराज यांनी मराठी मातीत धार्मिक सद्भावनेचे विचार रूजविण्याचे महत्वाचे कार्य केले. लोप पावत चाललेल्या मानवतेच्या काळात संत शेख महंमद महाराजांनी समानतेची विचारधारा मांडली. आपल्या साहित्यातून अंधश्रध्दा व अनिष्ट रूढी, परंपरा व प्रथांवर प्रहार करून त्यांनी अज्ञानी समाजात वैज्ञानिक दृष्टीकोण रूजविण्याचे कार्य केले. त्यांनी वारकरी संप्रदाय व सुफी संप्रदायांचा अभ्यास करून समतेचे विचार मांडले. तसेच, कुराण व पुराणांचे तत्वज्ञान व कार्य एकच आहे, अशा समतेच्या विचारांचा प्रसार केला. मराठवाडयातील बीड जिल्हयातील धारूर येथे संत शेख महंमद महाराज यांचा जन्म झाला. अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा हे त्यांचे मूळ गाव आहे तर त्यांचे मूळचे मुस्लिम घराणे हे बीड जिल्हातील पूण्यवाहिरे येथील आहे. या तिन्ही ठिकाणी शेख महंमदांची उपासना भक्तीभावाने केली जाते. हिंदू लोक इथे पारायण, भजन, कीर्तन करतात तर मुस्लिम लोक प्रार्थना, कुराणाचे पठन करतात. या ठिकाणी हिंदू-मुस्लिम एकत्र येतात या स्थानाला कोणी दर्गा तर कोणी मंदिर म्हणतो. ही स्थळे मानवतेची व धार्मिक सद्भावनेची उत्तम उदाहरणे असून भारतासह जगाला संत शेख महंमदांनी दिलेल्या विचारांचे प्रतीक आहे.

गुरु चांद बोधले यांनी संत शेख महंमदांना ज्ञानेश्वरी ग्रंथाची प्रत दिली आणि येथूनच त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. ज्ञानेश्वरीने त्यांच्या मनावर अध्यात्माचा शुध्द संस्कार केला. त्यांच्या साहित्यात ज्ञानेश्वरीतील प्रतिमा, प्रतीक पदोपदी दिसून येतात. कुराण आणि पुराणांचे कार्य एकच आहे हा गुरुंकडून मिळालेला समतेचा विचार संत शेख महंमद महाराजांनी महाराष्ट्रात सर्वदूर पोहोचविण्याचे कार्य केले अशा धार्मिक सद्भावनेचे प्रतिक असणाऱ्या संत शेख महंमद महाराजांच्या कार्याचा थोडक्यात परिचय प्रस्तुत ठिकाणी घेतलेला आहे.

**समाजप्रबोधनाचे कार्य -**

संत कबीरांचा एकेश्वरवादाचा पुरस्कार करण्याचे व कबीरांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य शेख महंमदांनी केले. 'सच्चा पीर कहे मुस्लमान, मराठे म्हणती सद्गुरुपूर्ण पण दोन्हीत नाही भिन्नत्वपण, आखे खोलो देखो भाई'. अशा शब्दात त्यांनी हिंदु- मुस्लिम धर्म एकच आहे हा समानतेचा विचार मांडला. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरेवर त्यांनी कठोर टीका केली व समाजाचे प्रबोधन केले. 'अविनाशी साही दर्शनाची सोंगे पाखंडयांनी घेतली अनेक' अशा परखड शब्दात टीका करत विवेक बुध्दीने गुरु करण्याची शिकवण शेख महंमदांनी दिली. 'मूर्ख लोक नवस करती देवांप्रती आणि मागती धनसंपत्ती''. असे सांगून त्यांनी अज्ञानी लोकांमध्ये ज्ञानाचे अंजन घालण्याचे व विज्ञाननिष्ठ दृष्टीकोण रूजविण्याचे कार्य केले.

संत शेख महंमद आणि संत तुकाराम हे समकालीन आहेत. त्यांच्या भेटीचे अनेक दाखले आहेत. एकाबाजुला वारकरी संप्रदायाशी त्यांचे नाते आहे तर दुसरीकडे सुफी संप्रदायाशीही त्यांचे नाते आहे. या दोन्ही संप्रदायाचा अभ्यास करून त्यांनी उभय संप्रदायांचे तत्वज्ञान एकच असल्याचे पटवून देत समाजाला समतेचा मार्ग दाखविला. संत शेख महंमदांनी समता, विवेकवाद आणि एकेश्वरवादासाठी केलेले कार्य आदर्शवत आहे. त्यांनी लिहीलेल्या 'निष्कलंक प्रबोध', 'योगसंग्राम' आणि 'पवन विजय' या ग्रंथाच्या व स्वरचित 'भारुड', 'अभंग' या माध्यमातून त्यांनी समाजाला हितोपदेश केला व समानतेचा संदेश दिलेला आहे.

'कबीराचा शेका' असे गौरवाने संत शेख महंमद महाराजांना म्हटले जाते. ते मुक्तचिंतक आणि प्रबोधनकार व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भानेही यथार्थ आहे. डॉ. रा. चिं. ढेरे 'योगसंग्राम'च्या प्रस्तावनेत लिहितात,"शेख महंमद हे कबीराच्या प्रकृतीचे मुक्तचिंतक आणि प्रबोधक असल्यामुळे त्यांनी लोकजीवनातील अनिष्ट प्रथांचे सूक्ष्म निरीक्षण करून, ती सर्व अनिष्टे विवेकाच्या प्रखर अग्नीत जाळून टाकली आहेत. त्यांचे लोकनिरीक्षण थक्क करणारे आहे. चाकोरीतले जीवन जगणाऱ्या जीवांना गरगरायला लावणारे आहे. त्यांनी हे लोकनिरीक्षण जसे निरभ्र दृष्टीतून केले आहे, तितक्याच उघड्या शब्दांतून त्यांनी ते व्यक्तही केले आहे." ते पुढे लिहितात, "धर्माच्या नावावर चालणारे भावहीन कर्मकांड, शुद्ध परमार्थाशी विसंगत असणारी आंधळी क्षुद्र देवतोपासना आणि धर्मक्षेत्रातली दांभिकता यांवर शेख महंमदांचा मुख्य कटाक्ष आहे. शुद्ध परमार्थाच्या या वैऱ्यांवर त्यांनी एखाद्या रणधीर वीराप्रमाणे चौफेर हल्ला चढविला आहे. या बाबतीत त्यांनी कुणाचीही भाडभीड ठेवलेली नाही.'

संत शेख महंमदांचे हे मुक्तचिंतन आणि प्रबोधन विभूतिमत्त्व पुढीलांना प्रभावित करणारे होते हे निःसंशय. संत तुकोबाराय यांचे चिंतन आणि प्रबोधन विचार ज्या पद्धतीने व्यक्त झाले आहेत, ती परंपरा नक्कीच वा. सी. बेंद्रे म्हणतात त्याप्रमाणे संत शेख महंमदांच्या मार्गाने गेली आहे. महाराजांनी समाज प्रबोधनाचे धारदार शस्त्र परजले असावे ते संत एकनाथ महाराजांचे सौम्य उपहासात्मक प्रबोधन प्रयत्नांचा परिणाम लक्षात घेऊन असे म्हणण्यास पुरेसा वाव आहे.

योगमार्गाचा अथवा भक्तिमार्गाचा प्रसार व प्रचार किंवा स्व-द्धार एवढीच भूमिका मध्ययुगीन संतांची नव्हती याविषयी सर्वच अभ्यासकांचे एकमत आहे. लोकोद्धार किंवा लोकप्रबोधन अशी भूमिका घेऊन मध्ययुगीन संतांनी लोकशिक्षक वृत्ती जोपासली होती हे स्पष्टपणाने जाणवते संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास या संतांचा विचार केला तर एकूणच समाजाच्या स्थितीगतीचे मुक्तचिंतन करून समग्र परिवर्तनासाठी अनिष्टत्व, खलत्व, अंधत्व, विकृती, दांभिकता, पाखंड यावर प्रहार करून; प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. 'बुडति हे जन न देखवे डोळा' असे जाहीर करून संत तुकोबारायांनी आकांत मांडलेला दिसतो. हे प्रहार करून प्रबोधन करण्याची संतांची भूमिका, त्यांच्या ठायी परमेश्वरासारखीच 'सत्य प्रेम करुणा' अपार भरलेली अशी होती. संत शेख महंमद महाराजांची भूमिका यापेक्षा वेगळी नाहीच.

**संत परंपरेतील कीर्तनकार :** चांद बोधले यांचा अनुग्रह लहान वयातच संत शेख महंमदांना प्राप्त झाला. आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धार करण्यासाठी, भक्तिमार्गाचा प्रसार व प्रचार झाला पाहिजे; हे संत

ज्ञानेश्वर, संत नामदेव व इतर संत यांच्यापासून चालत आलेली 'नाचु कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी' ही भागवत धर्माची परंपरा संत शेख महंमद महाराज यांनी, संसारप्रपंच सांभाळीत, चालविण्याचा निश्चय केला. चांद बोधले यांचे शिष्य, जनार्दन स्वामी यांचे गुरूबंधू आणि राजेमहंमद यांचे पुत्र या नात्यांनी राजाश्रयी असल्याप्रमाणे संत शेख महंमद महाराजांना, मुस्लिम असूनही; हिंदू परंपरेतील हरिभक्तांनी सहज स्वीकारल्याचे दिसते. म्हणूनच संत शेख महंमद महाराजांनी कीर्तनकारवृत्ती स्वीकारली. वा. सी. बेंद्रे यांनी नोंदविलेल्या एका अनामिकाने लिहिलेल्या संत शेख महंमद महाराजांच्या चरित्रपर अभंगात, कीर्तनकार म्हणून शेख महंमद महाराजांच्या सदैव चाललेल्या भ्रमंतीचा उल्लेख आला आहे.

अनामिक म्हणतात, “मूळ पुंडीबाहिरे गावचे शेख घराण्यातील शेख महंमदांचा जन्म जरी धारूर येथे झाला असला, तरी दौलताबाद, बेदर, तेलंगण, इंदूर, बीड, भागानगर, कर्नाटक अर्थात उत्तर, दक्षिण, पश्चिम, पूर्व, ईशान्य, आग्रेय, नैऋत्य अशा अष्टदिशांना संत शेख महंमदांनी तीर्थाटन केले. या भ्रमंतीत तर त्यांनी कीर्तन केलेच. तथापि "वडाळी, सुरवडी, देऊळगाव, श्रीगोंद्यात विशेषतः, कोरेगाव, राशीन विशेषतः, आनंतगांव या भोवतालच्या गावांना त्यांची सतत भ्रमंती होत असे." या गावांमध्ये रोज दोन कथा होत असत. या कथांच्या माध्यमातून सगुणोपासना आणि निर्गुणोपासना या दोन्ही मार्गांच्या प्रसाराचे कार्य संत शेख महंमद महाराज करीत असत. आणखी एक अनामिक महाराजांविषयी लिहितात. "जय जय महंमदा सद्गुरू ज्ञानसागरू ब्रह्मविद्येचा दाता", "महंमद वर्णी महावाक्य गीता", वा. सी. बेंद्रे यांनी 'आरत्या प्रकरणात नोंदलेल्या या अनामिकाच्या उल्लेखातून संत शेख महंमद कीर्तनाच्या माध्यमातून प्रभावीपणे लोकांचे प्रबोधन करत असावेत हे लक्षात येते.

संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम आणि त्यानंतरही लोकरंजनासाठी; कूटरचना, भारूड, रूपके, ओवीगीते, अभंगगीते, गायन आणि वादन यांचा आश्रय घेतलेला दिसतो. या परंपरेला संत मुक्ताबाई आणि संत जनाबाई ह्याही अपवाद नाहीत. संत एकनाथ यांनी तर या गोष्टीची परमावधी केलेली दिसते.

संत शेख महंमद महाराज यांना तर मुस्लिम समाज आणि हिंदू समाज या दोहोंमध्येही समत्वाचे, अद्वैताचे संदेशन करीत संसारप्रपंच, गावगाडा, नीतीव्यवहार, राजव्यवहार यासंबंधात प्रबोधन करून समाज धर्मनिरपेक्ष स्वरूपात भेदरहिततेने, माणूस म्हणून, प्रेममूलकतेने उभा राहावा असे वाटत होते. रूढीग्रस्तता, अंधश्रद्धा, शोषकता, स्वार्थपरता, भ्रममूलकता, वासनांधता, अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचार यांतून समाजमुक्त होऊन; सत्य, प्रेम आणि करुणेने भरून भारून असावा असे वाटत होते. नवविधाभक्ती आणि प्रामुख्याने नामभक्तीचा जागर त्यासाठी करावयाचा होता. संत शेख महंमद महाराजांनी त्यासाठी धृपदयुक्त ओवीगीते आणि अभंगगीते यांची मांडणी तर केली त्याचबरोबर त्यांनी रूपक रचनांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. गणेश, विनायक, राम, विठ्ठल, पंढरी, लळित, वासुदेव, जोगी, पांगुळ, बणजारा, सौरी- मुंढा, कैकाये, जखडी, फतेहनामा, महात्मा, तेली, नापिक, हाटकरी, कवि, तरू, हिंदोळा, राधा, आशीर्वाद, कलियुग, प्रलय अशी रूपके कीर्तनातून सादर केली.

**बहुभाषाप्रभु -**

वा. सी. बेंद्रे कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत नमूद करतात, "त्या काळीं आपले धर्मग्रंथ मुसलमानांनाही समजाऊन देण्याकडे हिंदू विद्वान संत महंतांची जशी प्रवृत्ती होती तशीच मुसलमानांचीही हिंदू संस्कृती जाणून घेण्याची प्रवृत्ती जागृत झालेली होती असेस्पष्ट दिसते. अधिकारीवर्गाच्या कुटुंबात लेखन, वाचन हे आवश्यक धन म्हणून सर्रहा साध्य करून घेण्याचा प्रयत्न होत होता. "ते पुढे लिहितात, "त्या काळी अध्ययनार्थ आवश्यक असणाऱ्या संस्कृत भाषेच्या ज्ञानाला पूर्णपणे मोकळीक होती." वा. सी. बेंद्रे यांचे हे निरीक्षण लक्षात घेतले तर त्याचा प्रत्यय संत शेख महंमद महाराजांच्या ग्रंथलेखनातून सतत येत राहतो. ते लिहितात, " 'शिवस्वरोद' या ग्रंथाचा अनुवाद शेख महंमदांनीं आपल्या 'पवनविजय' या ग्रंथात केला आहे. संस्कृत आणि मराठी या भाषांवरील प्रभूत्व यांतून सहजच स्पष्ट होते."

संत शेख महंमद महाराजांची ग्रंथसंपदा आज जी उपलब्ध आहे, त्यापेक्षा ती अधिक असावी असा संकेत मिळत राहतो. त्यांचे लेखन वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षांपासून सुरू झाले असावे याला दुजोरा मिळतो. त्यातच ते योगभ्रष्ट विभूति होते याविषयी सहज अनुभूती येते तुर्की, हिंदी, मराठीच्या प्रादेशिक भाषा, उर्दू आणि संस्कृत या सर्व भाषा शेख महंमद महाराजांना अवगत होत जाणे अगदी स्वाभाविक होते. त्या भाषा त्यांना केवळ अवगत होत्या एवढेच नव्हे तर त्या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते हे ही स्पष्टपणे जाणवते. त्याचबरोबर सर्व भाषांतील अध्यात्मिक, शास्त्रीय परिभाषा त्यांना अवगत होती हेही निश्चित जाणवते. त्यांच्या या बहुभाषाप्रभुत्वाची अनेक उदाहरणे अगदी सहज त्यांच्या उपलब्ध ग्रंथसंपदेतही मिळतात. या भाषाज्ञानाचा वापर तर त्यांच्या ग्रंथात मोकळेपणाने व सहज स्वरूपात त्यांनी केला आहेच. त्याचबरोबर हिंदू आणि मुस्लिम परंपरेतील सर्वांना आपल्या ग्रंथातून ज्ञान व्हावे यांसाठी त्यांनी 'शब्दकोश' निर्मितीचा केलेला प्रयत्न आश्चर्यकारक आहे. असा प्रयत्न मध्ययुगीन कोणा संतकवींनी केलेला दिसत नाही.

**सारांश :** तत्कालीन कालखंडात बहुतांशी मुस्लिमांची सत्ता होती तर बहुसंख्य जनता हिंदू होती. दोन्ही धर्मात देव, पूजाअर्चा, राहणीमान यात फरक होता. हिंदू मुर्तीपुजक तर मुस्लिम निर्गुण निराकार अल्लास भजणारे, हिंदू धर्मात जातीवर्ण व्यवस्था प्रबळ होती ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या वर्णव्यवस्थेची मुळे घट्ट रोवलेली होती. प्रत्येक जातीचे देव व परंपरा वेगळ्या होत्या. श्रेष्ठ, कनिष्ठ यावर जातीवाद होत होता. समाज बुरसट विचाराने रसातळाला गेला होता. समाज दिशाहीन झाला होता. अशावेळी एका समाधसुधारकाची, समानतेची वागणुक देणाऱ्या महात्म्याची आवश्यकता होती ती संत शेख महंमद महाराजांच्या रूपाने पूर्ण झाली.

**संदर्भ ग्रंथ -**

०१. महासंवाद, ऑगस्ट ०५, २०२१ ०२. डॉ. अनिल सहस्रबुद्धे, संत शेख महंमद महाराज, गंधर्व वेद प्रकाशन

०३. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा भाग पहिला, इ.स. १३५० ते १६८०, संपा. स.ग.मालशे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१०

०४. विकिपीडिया

**संत शेख महंमद महाराज : धार्मिक सद्भावनेचे प्रतिक**

**प्रा. संदीप परदेशी**